दैनिक लोकांकीत

सत्याच्या बरोबर बातमीच्या पुढे जाणारे वृत्तपत्र

मुख्य संपादक-संजय पवार

• (महाराष्ट्र) • वर्ष ९ वे • RNI : MAHMAR/2017/7448 • सोमवार दि.४ मे २०२६ • अंक-१०१ • दैनिक • पाने ४ • पान १ • किंमत २ रु.


## मुंबई-सातारा महामार्गावर कारला भीषण आग

**मुंबई**-पुण्यातील सातारा-मुंबई महामार्गावर स्वामीनारायण मंदिराजवळ एका चारचाकी वाहनाला (क्रमांक MH 43-CG-4068) भीषण आग लागल्याची दुर्घटना घडली. या आगीत संबंधित वाहन पूर्णपणे जळून खाक झाले असले तरी, वाहनातील सर्व प्रवासी वेळीच बाहेर पडल्याने सुदैवाने कोणताही अनर्थ घडला नाही. दरम्यान, या घटनेमुळे महामार्गावर काही काळ विस्कळीत झालेली वाहतूक सुरळीत करण्यासाठी वाहतूक पोलिसांकडून युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, पुणे-सातारा महामार्गावर आज सायंकाळच्या ७.४५ च्या सुमारास पाचगणीहून पुण्याच्या दिशेने येणाऱ्या एका वॅगनआर कारला (क्रमांक MH 43 CG 4068) भीषण आग लागली.

# पुणे पोलिसांना भ्रष्टाचाराचा विळखा महिला पोलिसाने घेतली लाच

## पुणे पोलिसांचे लाचखोरीचेकारणामे;बढती झालेल्या वैशाली मुरलीधर तोटेवार यांचे कारणाने;शहरातील पोलिसांना झाले तरी काय

**पुणे । रमेश जयस्वाल**

पुणे शहरातील पोलिस दलात नेमकं चाललाय तरी काय सलग दुस-या दिवशी पुणे पोलिस दलातील दोन अधिकारी पुणे लाचलुचपत प्रतिबंधक लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचत तीस लाखांची लाच घेतांना पकडले यात पोलिस दलात खळबळ माजलेली आहे

महाराष्ट्र दिनाचा उत्साह शहरात सुरू असतांना लाचलुचपत विभागाने केलेल्या कारवाईत महाराष्ट्र पोलिस दलात खळबळ उडाली आहे लोहगाव पोलिस ठाण्यातील लाचखोरीच्या कारभार थेट पुणे पोलीस आयुक्तालयातील आर्थिक गुन्हे शाखेच्या महिला अधिका-यांनी २९ लाखांची लाच स्विकारताना कारवाई करण्यात आली आहे पहिली घटना लोहगाव पोलिस ठाण्यातील पोलीस उपनिरिक्षक मनोज मधुकर बरूडे यांना लाचलुचपत प्रतिबंधक रचलेल्या सापळ्यात रंगेहाथ पकडले पोलिस दलातील अधिकारी कश्याप्रकारे सर्वसामान्यांची अडवणूक करत लाच स्विकारत आहे शहरातील सर्वंच पोलिस ठाण्यात अंतर्गत लाच घेण्याचा प्रकार पुढे येत आहे ठाण्यातील अधिकारी सांगतात अवैध धंदे बंद आहे मग ठाण्यातील अधिकारी आतून लाच स्विकार कसे






करतात अनेक नागरिकांच्या तक्रारी असतात परंतू पोलिस ठाण्याची पायरी चढायची नाही आणि कोर्टाची पायरी चढायची नाही म्हणून प्रकरण ठाण्या अंतर्गत मिळवायची म्हणून आणि ही कटकट पुढे लागू नये म्हणून काही पैसे देऊन प्रकरण अनेक ठिकाणी मिटविण्याचा प्रकार राजेरोसपणे सुरू आहे सहाय्यक पोलिस निरिक्षक वैशाली तोटेवार आणि पोलिस उपनिरिक्षक मनोज मधुकर बरूटे यांना प्रचंड लाच स्विकारताना स्वीकारतांना एसीबीच्या पथकाने ताब्यात घेतले आहे वैशाली तोटेवार यांची नुकतीच लोहमार्ग ( मुंबई ) येथे बदली झाली होती त्यांना पुणे पोलीस दलातून नियमाने कार्यमुक्त करण्यात आले होते त्यांनी पुणे सोडण्या पुर्वी आर्थिक गुन्हे शाखेतील एका प्रलंबीत प्रकरणात मदत करण्याच्या नावाखाली २९ लाखांची मागणी केली होती बदली होऊनही या बयेणे पदांचा गैरवापर करत वसुली करण्याचे प्रकार केला आणि रंगेहाथ पकडण्यात आले आहे या प्रकरणात आरोपी वैशाली तोटेवार आणि मनोज बरूटे यांच्यावर भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमानुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहे

।।। काही अनेक वरिष्ठ अधिकारी लाचखोरीत गुंतलेले ।।।

अनेक ठिकाणी वाहतूक विभाग ,गुन्हे शाखा विभाग ,पोलिस ठाण्याचे काही अधिकारी यांनी खाजगी व्यक्ती मार्फत लाच स्विकारणे ,पानटपरी वर लाच स्विकारणे, सोबत एक व्यक्ती सोबत ठेऊन लाच स्विकारणे सारखे कारणाने अनेक ठिकाणी सुरू आहे पदाचा गैरवापर करत वसुली करण्याचा प्रकार यामुळे पोलिस दलाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न चिन्ह निर्माण होत आहे या मागे आणखी कोणी बडे मासे दडलेले आहे रोजचं अनेक ठिकाणी कारवाई करत लाच प्रकरणी अनेकांवर कारवाई होत आहे पुणे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी अवैध धंद्यावर लगाम लावल्या नंतर वसुली करणारे ईतर मार्गाचा वापर करून आजही लाचखोरी सुरू आहे आजही अनेक पोलिस ठाण्यातून,वाहतूक विभागा कडून, गुन्हे शाखे कडून लाचखोरी केल्या शिवाय यांचे पोट भरत नाही यांच्या या दडपशाही मुळे सर्व सामान्य जनता त्रस्त झालेले आहे यावर आयुक्तांनी तोडगा काढणे गरजेचे आहे नाही तर हा प्रकार अवैध धंद्या पेक्षा पोलीस दलात फोफावणार असल्यांचे दिसत आहे.

# ठाण्यातील डी-मार्टमध्ये मुदतबाह्य केक विक्रीचा धक्कादायक प्रकार

## भाजपचे अखिलेश पाल यांसकडून उघड तर कारवाईची मागणी

**संतोष पडवळ । ठाणे**

ठाणे शहरातील ढोकाळी परिसरातील D Mart मध्ये एक्सपायरी डेट संपलेल्या केकची विक्री होत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. Britannia Industries च्या Gobbles ब्रँडचे केक एक्सपायर होऊन १५ दिवस उलटल्यानंतरही स्टोअरमध्ये विक्रीसाठी ठेवण्यात आले होते.


मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित केकची एक्सपायरी तारीख १९ एप्रिल २०२६ होती. मात्र २ मे २०२६ रोजीदेखील सुमारे ५० हून अधिक पाकिटे विक्रीसाठी रॅकमध्ये ठेवण्यात आली होती. धक्कादायक बाब म्हणजे या उत्पादनांची बिलिंगदेखील सुरू होती.सदर प्रकार तेव्हा उघडकीस आला, जेव्हा ग्राहक मिलिंद जाधव यांनी ३० एप्रिल रोजी हा प्रॉडक्ट खरेदी केला. त्यांनी २ मेच्या संध्याकाळी



केक खाल्ल्यानंतर पोटदुखी व उलट्यांचा त्रास सुरू झाला. त्यानंतर प्रॉडक्टवरील तारीख तपासली असता तो केक १९ एप्रिललाच एक्सपायर झाल्याचे दिसून आले. त्यानंतर पुन्हा डी-मार्टमध्ये जाऊन पाहणी केली असता, एक्सपायरी डेटचे केक मोठ्या प्रमाणात स्टॉकमध्ये ठेवून विक्री सुरू असल्याचे दिसून आले. माहिती मिळताच ठाणे भाजपचे अखिलेश पाल, राकेश मिश्रा यांनी घटनास्थळी जाऊन व्हिडिओ व फोटोद्वारे पुरावे गोळा केले आणि हा प्रकार उघड केला. विशेष म्हणजे हे केक लहान मुलांकडून मोठ्या प्रमाणात खाल्ले जातात. त्यामुळे एक्सपायरी खाद्यपदार्थांची विक्री ही मुलांच्या आरोग्यासह जीवासाठीही धोका ठरू शकते. भाजपचे अखिलेश पाल, शिवसेना (उबाठा) प्रदीप पुर्णेकर, मिलिंद जाधव आणि राकेश मिश्रा यांच्या सतर्कतेमुळे समोर आला.

याप्रकरणी अखिलेश पाल आणि मिलिंद जाधव यांनी पुराव्यांसह कापूरबावडी पोलीस स्टेशन तसेच FDA कडे तक्रार दाखल करून डी-मार्टवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

## रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन येथे भीषण अपघात.ट्रेलर पीक टेम्पोवर कोसळल्याने टेम्पोचा चालक जागीच ठार



**मुंबई । प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन म्हसळा मार्गावर बोडणीची डाग या घाटात तीव्र उतारावर चालकाचे ट्रेलर वरील नियंत्रण सुटल्याने भीषण अपघात झाला आहे.सदरची घटना सकाळी आठ वाजता घडली आहे.नवी मुंबई येथून श्रीवर्धन तालुक्यातील बागमांडला येथे सागरी पुलाचे काम सुरू असून पुलाचे साहित्य घेऊन जाणारा कळंबोली येथील ट्रेलर चालक तौफेल सलाउद्दीन अहमद याने श्रीवर्धन म्हसळा हा घाट रस्ता व वळणदार तीव्र उताराचा असून देखील आपल्या ताब्यातील ट्रेलर (एम एच ४६ बी बी ४७१२) निष्काळजीपणे श्रीवर्धन च्या दिशेने आणत होता.बोडणीची डाग येथील एका वळणावर चालकाचा ट्रेलर वरील ताबा सुटल्याने ट्रेलर ने एका चारचाकी ला धडक दिली आणि समोरून येणाऱ्या आंबा वाहतूक करणाऱ्या एम एच ०६ जी ९३२० या क्रमांकाच्या महेंद्रा पीक अप टेम्पोवर ट्रेलर कोसळला.या भीषण अपघातात टेम्पो चालक अजय भालचंद्र जाधव वय २५ हा जागीच ठार झाला.ट्रेलर रस्त्यावर आडवा झाल्याने काही वेळ वाहतूक खोळंबली होती.

# शासकीय आश्रमशाळा चिंबीपाडाचा बारावी (एच एस सी) निकाल शंभर टक्के

**भिवंडी | प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा चिंबीपाडा, ता. भिवंडी, जि. ठाणे या विद्यालयाने यावर्षी बारावी (उच्च माध्यमिक) परीक्षेत १०० टक्के निकालाची अभिमानास्पद नोंद करत उल्लेखनीय शैक्षणिक यश संपादन केले आहे. ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देत ही शाळा सातत्याने प्रगतीचा आलेख उंचावत मागील वर्षी प्रमाणेच यावर्षीचा निकाल देखील १०० टक्के लागला असून परिश्रमांचा अध्याय ठरला आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने आज बारावीचा निकाल जाहीर केला. राज्याचा सरासरी निकाल ८९.७९ टक्के लागला असताना चिंबीपाडा येथील या शासकीय आश्रमशाळेने १०० टक्के निकाल लावून आदिवासी शिक्षण क्षेत्रात ओळख निर्माण केली आहे.

यावर्षी विद्यालयातून एकूण ४८ विद्यार्थी बारावी परीक्षेला होते. या सर्व ४८ विद्यार्थ्यांनी यश संपादन करून शाळेचा शंभर टक्के निकाल लागला. त्यापैकी ९ विद्यार्थ्यांनी विशेष प्रावीण्य श्रेणीत




उत्तीर्ण होण्याचा मान मिळवला, कौतुकास्पद आहे.

विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये कु. करिष्मा जाधव हिने ८२.५० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक, कु. प्राजक्ता गवारी हिने ८१.८३ टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक,आणि कु. जुईली कोंगील हिने ७९ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांकावर झेप घेतली.

या तिन्ही विद्यार्थिनींनी परिस्थितीवर मात करत जिद्द, चिकाटी आणि शसातत्यपूर्ण अभ्यासाच्या घवघवीत यश संपादन केले असून त्यांनी शाळेसह संपूर्ण चिंबीपाडा परिसराचा मान उंचावला आहे.

आदिवासी व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

या यशामागे विद्यालयाचे मुख्याध्यापक संदीप कदम यांचे सक्षम शैक्षणिक नेतृत्व, शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, तसेच अधीक्षक, अधीक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची समन्वयपूर्ण मेहनत कारणीभूत ठरली आहे.

त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होऊन उत्कृष्ट निकाल शक्य झाला.

विद्यालयातील शिक्षकवर्गाने विद्यार्थ्यांना शिस्त, वेळेचे नियोजन आणि गुणवत्तापूर्ण लेखन कौशल्य विकसित करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. त्याचा थेट परिणाम यंदाच्या उज्ज्वल निकालातून दिसून आला.

गुणवंत विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. शिक्षक, कर्मचारी, पालक आणि ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव केला. अनेक पालकांनी आदिवासी भागातील आमच्या मुलांनीही मोठे यश मिळवू शकते हे शाळेने सिद्ध करून दाखवले, अशा भावना व्यक्त केल्या.

विद्यालयाच्या या दैदिप्यमान यशाबद्दल मुख्याध्यापक संदीप कदम, शिक्षक आर. एन. ठाकरे, आदिनाथ अवघडे, राजेश वळींकर, सविता जाधव अधीक्षक महादेव भंडारी, अधीक्षिका माधुरी लोखंडे, सर्व शिक्षकेतर कर्मचारी तसेच यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

शासकीय आश्रमशाळा चिंबीपाडाने मिळवलेले हे यश आदिवासी शिक्षणाच्या गुणवत्तेचे प्रेरणादायी उदाहरण ठरत असून आगामी काळातही अशीच यशाची परंपरा कायम राहील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची आढावा बैठक मुंबई येथे संपन्न

**कर्जत | प्रतिनिधी**

महाराष्ट्र दिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची आढावा बैठक मुंबई येथे कार्यालयात पार पडली या बैठकीला कर्जत शहरातर्फे शहराध्यक्ष व शहर कमिटी उपस्थित होती यामध्ये प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे व खासदार सुरेश म्हात्रे यांच्याबरोबर कोरोना काळात बंद झालेल्या रेल्वे गाड्या पुन्हा सुरळीत चालू व्हावेत व लांब पल्ल्याच्या गाड्यांना कर्जत रेल्वे स्थानकावर थांबा मिळावा कारण कर्जत रेल्वे पॅसेंजर असोसिएशनच्या कार्यक्रमाला जी सह्यांची मोहीम शहरांमध्ये घेतली गेली होती त्यामध्ये पक्षाने सहभाग घेतला होता तरी ह्या मीटिंगमध्ये कर्जत शहराला रेल्वेचा थांबा मिळावा अशी प्रमुख मागणी शहराध्यक्ष एडवोकेट भाऊसाहेब मोरे यांनी महाराष्ट्र रेल्वे बोर्डावर असणारे खासदार सुरेश म्हात्रे यांच्या जवळ केली होती व त्यांनी कर्जत शहरातील शिष्टमंडळ माझ्याकडे घेऊन या आपण डीआरएम



ऑफिसला बरोबर जाऊन त्यांच्याकडून आपल्या मागण्या मान्य करून घेऊ व त्यांच्याकडे जाऊन निवेदन देऊ असे आश्वासन दिले तसेच मी पुढच्या आठवड्यामध्ये आपण निवेदकांना बरोबर घेऊन या मी त्यांच्या मागण्या पूर्ण करण्याचा प्रयत्न करीन असे सुतोवाच केले तर महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी देखील राष्ट्रवादी काँग्रेसचा पक्षाचा पूर्ण पाठिंबा असल्याचे जाहीर केले

कर्जत तालुक्यात टोरंट प्रकल्प पोशीर धरण व शिलार धरण या दोन्ही धरणांना कर्जत शहराध्यक्ष एडवोकेट भाऊसाहेब मोरे यांनी विरोध केला होता प्रत्यक्ष धरण बाधित लोकांना भेटून त्यांच्या मागण्या हे धरण होऊ नये म्हणून आहेत असे पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष व खासदारांना सांगितले व त्यांनी दोघांनी स्वतः या गोष्टीकडे लक्ष देणार आहोत वेळ पडल्यास उपोषण स्थळी त्या दोन्ही धरणात धरण बाधित गावांना भेट देण्याचा आश्वासन दिले त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा आंदोलनाला पूर्ण पाठिंबा असण्याचे जाहीर केले.

# सुरक्षा रक्षक समीर भागोजी कोळवणकर यांना सन्मानित




**मुंबई | प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी कार्यालय मुंबई,शहर जुने कस्टम हाऊस, फोर्ट, मुंबई नं.४००००१ येथे १में रोजी सकाळी ०७:१५ वाजता महाराष्ट्र दिन आणि जागतिक कामगार दिनानिमित्ताचे औचित्य साधून सुरक्षा रक्षक मंडळाचे सुरक्षा रक्षक समीर भागोजी कोळवणकर यांना त्यांनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल कौशल्य व रोजगार मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या शुभहस्ते सन्मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.ते सध्या तामिळनाडू मेरकन्टैल बँकेमध्ये कार्यरत आहेत.या प्रसंगी मुंबई शहराचे जिल्हाधिकारी आंचल गोयल (IAS) उपस्थित होते.त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.विक्रोळी कन्नमवार नगर, शिंदे शिवसेनेचे माजी नगरसेवक व विद्यमान बेस्ट समिती सदस्य उपेंद्र सावंत यांनी समीर कोळवणकर यांचे अभिनंदन केले असून त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# प्रियांशी आशाराम जामनेरकर उरण तालुक्यातून प्रथम

**उरण | विठ्ठल ममताबादे**

बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी निकालाचा दिवस तसा कौतुकाचा आणि आनंदाचा होता सर्वत्र गुणवंत विद्यार्थ्यांवर अभिनंदनचा वर्षाव होत असताना अकोला जिल्ह्यातील अनकवाडी या छोट्याशा गावातील कुमारी प्रियांशी आशाराम जामनेरकर या विद्यार्थिनीने मुंबईत विभागातील उरण या तालुक्यात आपली बाजी मारली आहे. उरण येथील सिटीजन हायस्कूल अँड ज्युनियर कॉलेजमध्ये ८७.५०% गुण घेत घवघवीत यश प्राप्त करून सायन्स शाखेतून उरण तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. या उपेक्षित गुणवंत विद्यार्थिनीचे नाव कुमारी प्रियांशी आसाराम जामनेरकर असून सिटीजन हायस्कूल ज्युनिअर कॉलेज उरण येथे शिक्षण घेऊन शिक्षक सादिक सर, शैलेंद्र प्रजापती, नरेंद्र पाटील ,प्रमोद पाटील , व साजिया मामी यांच्या मार्गदर्शनाखाली व विवेकानंद येथील कोचिंग क्लासेस मध्ये शिक्षक दत्तात्रय शेळके , मयूर पाटील,आदित्य सर यांचे मार्गदर्शन घेऊन उत्तम अभ्यास करून तालुक्यातील पहिला क्रमांक पटकावला आहे. प्रियांशी चे वडील शेतकरी असून उरण येथे एसटी बस चालक आहेत व आईचे वडापावचे दुकान आहे.तिने दहावीपर्यंत जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूट मध्ये शिक्षण घेतले. स्नितिल पडते यांच्या मार्गदर्शनाखाली तिसरा क्रमांक दहावीत पटकावला होता. पुढे प्रियांशीला इंजीनियरिंग करायची आहे असे तिथे ठरविले आहे. कम्प्युटर सायन्स किंवा आर्टिफिशल इंटेलिजन्स या ब्रांच मध्ये पुढचे करिअर तिला करायचे आहे. सायन्स शाखेतून प्रियांशी आशाराम जामनेरकर ही उरण तालुक्यातून प्रथम आल्याने तिच्यावर सर्वच स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# व्हिजन फॅसिलिटी सर्विस ची उत्तुंग भरारी ;पाच वर्षात दोनशे प्लस क्लाईड

**पुणे । प्रतिनिधी**

पारंपारिक नोकरीच्या चौकटीत अडकून न राहता स्वतःचा व्यवसाय करण्याकडे तरुणाई आणि महिलांचा कल झपाट्याने वाढत आहे बदलत्या आर्थिक परिस्थितीत नोकरीतील स्थिरता मर्यादित वेतन वाढ आणि वाढती स्पर्धा यामुळे अनेकांनी स्वयंरोजगाराचा मार्ग स्वीकारला आहे स्वतःचा व्यवसाय स्वतःचा निर्णय या संकल्पनेला अधिक प्राधान्य मिळत असून उद्योजकतेकडे ओढ वाढत आहे मागील वर्षाच्या तुलनेत या आर्थिक वर्षात अनेक कंपन्यांनी नोंदणी केली आहे १ मे २०२१ मध्ये व्हिजन फॅसिलिटी सर्विस ची स्थापना झाली असून २०२६ पर्यंत या पाच वर्षाच्या कालावधी व्हिजन सर्विस फॅसिलिटी या कंपनीने मोठ्या प्रमाणात उतुंग भरारी घेतल्याचे दिसून येते उद्योजक क्षेत्रामधील वाढ ही केवळ आकडेवारी नसून स्वयंरोजगाराकडे झुकणाऱ्या मानसिकतेचे धोतक मानले जाते . नोकरीपेक्षा व्यवसाय आधीच स्थिर आणि वाढीच्या संधी देणारा पर्याय ठरत असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे असे व्हिजन फॅसिलिटीचे



**नोकरीचा काय भरोसा युवा तरुणांनी आपले भवितव्य घडविण्यासाठी उद्योग क्षेत्रामध्ये यावे स्वतःचा बिजनेस असणे उद्योग असणे हे केव्हाही फायद्यातच आहे स्वतःच्या कंपनीची योजना सवलती कायदेशीर महत्त्व जाणून घेणे गरजेचे आहे यामध्ये शासनाच्या विविध योजना अनुदाने कर्ज सहाय्य कर सवलती यामुळे नव उद्योजकांना प्रोत्साहन मिळते तसेच कायद्यानुसार नोंदणी केल्यास व्यवसायाला अधिकृत मान्यता मिळून बँक कर्ज परवाने आणि विमा सुविधा सहज उपलब्ध करून देतात**

**–अतिष काकनाटे**

**मॅनेजिंग डायरेक्टर व्हिजन फॅसिलिटी सर्विस पुणे**

डायरेक्टर सुरण काकनाटे यांनी कंपनीच्या पाचव्या वर्धापन दिनानिमित्त आपली प्रतिक्रिया देत असताना सांगितले तरुण उद्योजका सोबत महिलांचाही सहभाग उल्लेखनीय आहे घरगुती उद्योग बुटीक केटरिंग. ऑनलाईन विक्री यासारख्या क्षेत्रात महिलांनी मोठ्या प्रमाणावर पुढाकार घेतला आहे तर मग तरुणाई कशी मागे असेल उद्योग क्षेत्रामध्ये नवीन संधी शोधताना व्हिजन फॅसिलिटी सर्विस ने आपली कामगिरी जनतेसमोर त्यात अमानोरा . वेंकटेश अनुक्षा असाबि वेंचर .गोदरेज प्रॉपर्टीज .सिल्वर ग्रुप माउंट .भोजोरी .टाटा .स्कोडा .होंडा.कल्याणी डेव्हलपर्स . झेलेईना. एम .जी. अशा नामांकित कंपन्या सह दोनशे प्लस क्लाईट या कंपनीमध्ये सर्विस पुरविली जाते व्हिजन फॅसिलिटी सर्विसच्या शाखा मुंबई .नवी मुंबई .पुणे . येथे असुन इतर मोठ्या शहरांमध्ये क्लाइंट वाढवून शाखा वाढविण्यासाठी प्रयत्नशील आहे कंपनीच्या वाढदिवसानिमित्त विविध क्षेत्रांमधील उद्योजक. एस. पी .इंटरप्राईजेसचे एम.डी. दीपक निर्माले, .ग्लोबल इंटरप्राईजेसचे मयूर शिंदे. बालाजी इंटरप्राईजेसचे गणेश शिंदे. सम्यक पुलचे मालक महादेव रणदिवे. सोसायटी मॅनेजर निशांत कांबळे. अजित कांबळे. यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# कामगारांच्या हक्कांसाठी जागतिक कामगार नेते एकत्र लढू : महेंद्रशेठ घरत

## आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांचे नेपाळमध्ये कामगारांना मार्गदर्शन

**उलवे । प्रतिनिधी**

भारतीय कामगारांनी शेकडो वर्षे लढून मिळविलेले हक्क आणि कायदे बीजेपीच्या केंद्र सरकारने पायदळी तुडविले आहेत. २०१४ पासून आम्ही हे भोगत आहोत. त्यामुळे कामगार विरोधी धोरणे राबविणाऱ्या केंद्र सरकारचा आम्ही धिक्कार करीत आहोत. मी गेली ३८ वर्षे कामगारांसाठी लढतोय. दरम्यान, अनेक गुन्हे नावावर दाखल झाले आहेत; परंतु कामगारांच्या न्याय हक्कांसाठी मागे हटलो नाही. सध्या साडेतीन कोटी कामगारांचे नेतृत्व करताना आमची आयटीयुसी संघटना ताकदीने भक्कमपणे उभी आहे. त्यामुळे आम्ही सर्व जागतिक कामगार नेते कामगारांच्या न्याय हक्कांसाठी सदैव लढत राहू. नेपाळ सरकारने कामगारविरोधी भूमिका घेतल्यास आम्ही सारे रस्त्यावर उतरू आणि सरकारला 'सळो की पळो' करू, असे आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ महेंद्रशेठ घरत कामगारांना मार्गदर्शन करताना नेपाळमध्ये म्हणाले.

महाराष्ट्र दिन आणि जागतिक कामगार दिनानिमित्ताने नेपाळ ट्रेड युनियन काँग्रेसतर्फे दुसऱ्या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन शुक्रवारी (ता.१) करण्यात आले होते. त्यावेळी महेंद्रशेठ घरत प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

या परिषदेसाठी आयटीएफ लंडनचे जनरल सेक्रेटरी स्टीफन कॉटन, आशिया पॅसिफिक रिजनल सेक्रेटरी अब्दुल गनी सारंग, नेपाल काँग्रेस अध्यक्ष गगन थापा, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शेखरजी कोईराला, नेपाळ ट्रेड युनियनचे अध्यक्ष योगेंद्र कुमार, नेपाळ ट्रेड युनियन तथा आयटीएफचे एक्झिक्युटिव्ह बोर्ड मेंबर अजयकुमार राय इत्यादी यावेळी उपस्थित होते. नेपाळ ट्रेड युनियन काँग्रेसतर्फे दुसऱ्या राष्ट्रीय कामगार परिषदेचे उत्तम आयोजन केल्याने महेंद्रशेठ घरत यांनी त्यांचे अभिनंदन केले.



# अजनसोंडा (बु:) येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

## डॉ बाबासाहेब आंबेडकर विविधतेतून एकता घडविणारे संविधानकार–हणमंतराव पाटील

**लातूर । प्रतिनिधी**

अजनसोंडा बुद्रुक ता .चाकूर जिल्हा लातूर येथील भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विविधतेतून एकता घडविणारे थोर संविधानकार होते असे प्रतिपादन गावचे माजी सरपंच तथा लातूर जिल्हा परिषदेचे माजी सदस्य हनुमंतराव पाटील यांनी केले ते गावातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त अजनसोंडा( बु:) येथील कार्यक्रमात बोलत होते जयंती अत्यंत उत्साहात आणि मंगलमय वातावरणात साजरी करण्यात आली १४ एप्रिल २०२६ रोजी सकाळी साडेनऊ वाजता गावातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात गावचे माजी सरपंच व लातूर जिल्हा परिषदेचे माजी सदस्य हनुमंतराव पाटील यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक किसन बापू माने. उपसरपंच आबासाहेब माने .शिवाजीराव माने .



वारकरी संप्रदायाचे सिद्धू माने महाराज . आदर्श शिक्षक तातेराव भालेराव . दिनकर काकनाटे . संपतराव गायकवाड .यांच्यासह जयंती महोत्सवाचे अध्यक्ष अनिल भालेराव . सुशील काकनाटे . सुधाकर गायकवाड .गंगाधर भालेराव. हरिश्चंद्र काकनाटे. बाळू भालेराव .बौद्ध समाजातील सर्व आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहून ध्वजारोहण करण्यात आले . यावेळी जयंतीची तारीख २९ एप्रिल हि निश्चित करण्यात आली होती सकाळीच अन्नदाते किसन बापू माने यांच्यावतीने अन्नदान करण्यात आले अनेकांनी या भोजनाचा आस्वाद घेतला दुपारी चार वाजेपासून डॉ .बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूकीला सुरूवात करण्यात आली परिसरातील जनसमुदाय मोठ्या संख्येने सहभागी झाला होता ज्यामध्ये महिलांचा सहभाग लक्षणीय होता भिमरायाच्या विचारांचा जागर करत ही मिरवणूक गावातील मुख्य रस्त्याने वाजत गाजत रात्री ९ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात विसर्जन करण्यात आले या जयंती महोत्सवाचे नेतृत्व आंबेडकरी चळवळीतील सर्व युवा तरुणांनी सर्वांनी मिळून कार्यकर्त्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदर्श शिक्षक दिनकर काकनाटे यांनी केले तर उपस्थितांचे आभार अध्यक्ष अनिल भालेराव आणि सुशील काकनाटे यांनी माणले

या सोहळ्यामुळे संपूर्ण अजनसोंडा बुद्रुक परिसरातील उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

# पुणे जिल्ह्यातील नसरापूर मध्ये महाराष्ट्र दिनी चिमुकलीवर अत्याचार करून हत्या

## साडेतीन वय असणारी चिमूरडी; ६५ वर्षीय नराधमाने अत्याचार करत तिची हत्या करून शेणात गाडले; ग्रामस्थ आक्रमक मुलीचा मृतदेह पोलीस स्टेशन बाहेर ठेऊन रास्ता रोको

**पुणे । रमेश जयस्वाल**

पुणे जिल्ह्यातील भोर तालूक्यातील नसरापूर येथे महाराष्ट्र दिनी एका ६५ वर्षात नराधामाने साडेतीन वय वर्ष असलेल्या अल्पवयीन चिमुरीडीवर अत्याचार करून तिची हत्या केली या घटने नंतर नसरापूर ग्रामस्थांनी मुलीचा मृतदेह पोलीस ठाण्याच्या बाहेर ठेऊन गावक-यांनी रास्ता रोको आंदोलन केले या विकृत कृत्य करणा-या नराधामाला ताब्यात देण्याची मागणी करत होते यानंतर या आंदोलकांना स्वतः पोलिस अधिक्षक संदीप सिंग गिल यांनी समजविण्याचा प्रयन्त केला यात या ठिकाणी परिस्थिती नियंत्रणात आहे या आंदोलकांना आरोपी विरोधात १५ दिवसांत दोषारोपपत्र न्यायालयात सादर करणार अशी भूमिका पोलीस अधिक्षक संदीप गिल यांनी दिली आरोपी पोलिसांच्या ताब्यात आहे याचं आरोपीने या पुर्वी सुध्दा असे कृत्य केले होते यानंतर याला जामीन मिळाल्या नंतर हे कृत्य केल्याचे वृत्त आहे ही साडेतीन वर्षांची चिमुरडी नरसापूरला आपल्या आजी सुट्टी निमित्त राहावयास आली होती नसरापूर राम मंदीर परिसरात खेळत असतांना येथून जवळ असलेल्या या नराधमाने गुरांच्या गोठ्यात नेऊन निर्दयपणे अत्याचार केल्या नंतर या चिमुरडीला दगडाने ठेचून खून केला मुलगी सापडत नाही म्हणून कुटुंबीयांनी आणि परिसरातील नागरिकांनी शोध घेतला असता ती सापडली नाही यानंतर या परिसरातील सीसीटीव्ही तपासणी केली असता या नराधमा सोबत एका बाजूला दिसत होती या नंतर ग्रामस्थ आणि



कुटूंबीयांनी शोध घेतला असता एका गोठ्यात झाकलेल्या अवस्थेत मृतदेह आढळला यानंतर सीसीटीव्ही पाहिलेल्या व्यक्ती बरोबर ती मूलगी गेली होती या व्यक्तीचा शोध घेतला असता त्याला पकडण्यास आल्या नंतर मुलगी कोठे आहे, तू काय केलं असे विचारले असता मी काहीच केलं नाही अशी उडवा उडवीचे उत्तरे मिळतात होती या नंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत यास ताब्यात घेतले संतप्त नागरिकांनी या नराधमाने ताब्यात देण्याची मागणी केली ग्रामस्थ संतप्त होते या मुलीचा मृतदेह हलविण्यास तयार नव्हते शेवटी पोलिस अधिक्षक संदीप गिल यांनी कुटुंबिय आणि ग्रामस्थांची समजूत घातल्या नंतर प्रकरण थांबवले पुणे जिल्ह्यातील भोर तालूक्यातील नसरापूर येथे एक मे महाराष्ट्र दिनी एका साडेतीन वर्षांची चिमुरडीवर अत्याचार करत हत्या केल्या प्रकरणी जिल्ह्यात खळबळ उडाली आहे .

# दिव्यातील जनगणना अधिकारी म्हणून नेमणूकीतील दांडीबहाद्दर शिक्षकांवर गुन्हा दाखल

**संतोष पडवळ । ठाणे**

दिवा शहरातील शाळांतील जनगणना अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेल्या दांडीबहाद्दर शिक्षकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुंब्रा पोलीस ठाण्यात अदखलपात्र अहवाल भा.न्या.सं. २०२३चे कलम २२२ प्रमाणे तक्रारदार श्री शिवप्रसाद नागरगोजे, सहाय्यक आयुक्त तथा चार्ज जनगणना अधिकारी दिवा प्रभाग समिती ठाणे महानगरपालिका ठाणे यांच्या वतीने ड्यु ड्रॉप इंग्लिश स्कूल दिवा येथील शिक्षक नामे श्रीमती अनुष्का नाईक, दीपिका पगारे, दिव्या हळदणकर, जयप्रकाश बेन बन्सी, कल्पना महाले, माधुरी गुरव व इतर तसेच ग्लोबल इंग्लिश स्कूल दिवा येथील शिक्षक नामे अनिकेत





संजय जाधव, दीक्षा कन्हैया सिंग, संध्या रवी अहिरे, अनिकेत ओम प्रकाश गुप्ता, यश विश्वास भोसटेकर व इतर आणि साउथ इंडियन स्कूल दिवा येथील शिक्षक अरुण कुमार यादव व इतर यांनी २३/०४/२०२६ रोजी पासुन ते अद्याप पावेतो प्रकार यातील तक्रारदार व विरोधक हे शासकिय कर्मचारी असुन, विरोधक कर्तव्यावर अनुउपस्थित असल्याने त्यांच्या विरोधात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जनगणना २०२७ चे अनुशंगाने तक्रारदार यांची चार्ज जनगणना अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली असून यांना जनगणनेसाठी कर्तव्य नेमण्यात आलेले आहे. जनगणना २०२७ चे अनुशंगाने नेमलेल्या शिक्षकांना दिनांक २३.०४.२०२६ रोजी पासून प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात आलेले आहे. विरोधक यांना जनगणना कर्तव्यासाठी हजर राहणे कायदेशीर दृष्ट्या बांधील असतानाही त्यांनी जनगणना कर्तव्यासाठी अनुपस्थित राहून सहाय्य नाकारले म्हणून त्यांचे विरोधात अदखलपात्र अहवाल भा.ना.सु. सं१७४(२) (ii) नुसार संबधित कोर्टाकडुन दाद मिळविण्याची समज दिली आहे.

# कार्यकर्ता म्हणून तुमच्या पाठीशी उभा राहिल : आमदार सुनील राऊत

**मुंबई । प्रतिनिधी**

तुम्ही मला एकदा नाही लागोपाठ तीन वेळा आमदार म्हणून निवडून दिले.जसे मला निवडून दिले तसे आमच्या नगरसेविका सुनिता चंद्रशेखर जाधव यांनाही भरघोस मतांनी निवडून दिले.तशी आमची नगरसेविका सतत काम करेल.एक कार्यकर्ता म्हणून मी तुमच्या पाठीशी उभा राहिल.अशी ग्वाही
विक्रोळी कन्नमवार नगरचे शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार सुनील राऊत यांनी शनिवारी दिली.विक्रोळी कन्नमवार नगरातील तरुण मित्र मंडळाच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त तीन दिवस भरगच्च कार्यक्रम आयोजित केले होते.या प्रसंगी आमदार



सुनील राऊत बोलत होते.या प्रसंगी नगरसेविका सुनिता चंद्रशेखर जाधव, विभाग प्रमुख परम यादव, उपविभाग प्रमुख चंद्रशेखर जाधव, शाखा प्रमुख अभय राणे, तरुण मित्र मंडळाचे अध्यक्ष अमित कांबळे, सचिव वैभव गायकवाड, खजिनदार सचिन कुडवे आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमात लहान मुलांचे नाच,गाणी आदिंचे आयोजन केले होते.डॉ.बाबासाहेब आंबेडकर की जय यांच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता.

# फराह खानसोबत क्लूक इंडियाच्या नव्या कॅम्पेनची सुरुवात




**मुंबई । प्रतिनिधी**

उन्हाळ्याच्या काळासाठी क्लूक इंडियाने सिनेक्षेत्राशी संबंधित फराह खान हिच्याशी हातमिळवणी करत नव्या कॅम्पेनची सुरुवात केली आहे. फराहने घेतलेला शहरांचा घेतलेला अनुभव, तिचा प्रवास आणि पर्यटनाबाबतचे विचार यावर आधारित अपेक्षित आणि अनपेक्षित अशा पर्यटनाचा आनंद नागरिकांना घेता येणार आहे.क्लूकच्या 'वर्ल्ड ऑफ जॉय' मध्ये सामील होण्यासाठी फराह खान सिंगापूरला जाणार आहे. याआधी तिने या शहराला भेट दिली असली तरी आताचा तिचा अनुभव वेगळा असणार आहे. आपला खाजगी शेफ दिलीप याच्यासोबत ती यावेळी सिंगापूरची सफर करणार आहे. बहुतांश वेळा पर्यटक हे त्यांच्या नेहेमीच्या मार्गाने प्रवासाला जातात. लोकांनी केलेल्या शिफारशीनुसार ठिकाणे बघतात अथवा खाण्या-पिण्याचा आनंद घेतात. मात्र मोहिमेअंतर्गत क्लूक इंडिया पर्यटकांना वेगळ्या दृष्टीकोनातून प्रवासाचा आनंद चोखाळायची संधी देणार आहे.क्लूक इंडियाच्या डिजिटल पध्दतीने राबविलेल्या जाणाऱ्या मोहिमेची सुरुवात इन्स्टाग्रामच्या माध्यमातून होत आहे. फराह खानच्या प्रवास कथा, तिच्या तीन प्रवासाच्या संक्षिप्त मालिका यात पहावयास मिळतील. प्रसिध्द पर्यटन स्थळे, हिडन जेम्स, शेवटच्या क्षणी आखली जाणारी योजना किंवा एकदम नवा प्रवास यासाठी हरतऱ्हेचे मार्गदर्शन क्लूक इंडिया करते, असे कंपनीचे भारत आणि मध्यपूर्व देशांचे मार्केटिंग विभागांचे प्रमुख शिवम त्यागी यांनी सांगितले.

दैनिक लोकांकीत हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय त्रिंबक पवार यांनी पार्थ प्रिंटींग प्रेस, कर्नाळा भवन, ४५/६१, सहकारी भात गिरणी कंपाऊंड मार्केट यार्ड, पनवेल, जि. रायगड पिन ४१०२०६ येथे छापून मुख्य कार्यालय,शॉप नं.१२४, दत्त मंदिर चाळ, कोंकण नगर, नवजिवन सोसा. समोर, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई पिन.७८ पनवेल कार्यालय,साई शरण को-ऑप. ही. सोसायटी, प्लॉट नं. ५०, ऑफिस नं. १४, सेक्टर ८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल ४१० २०६ येथून प्रकाशित केले. मो. ९३२१५८५३६५